॥ श्री गणेशाय नमः ॥
कुणाल वधवा
9765595037
9405171771
श्रीराम बोरवेल्स
जमीन, घर, शेती यावर
४.७५, ५ व ६ इंची बोर करुन मिळेल.
तसेच सबमर्सिबल पंप बसवून मिळेल.
१४, राधाकृष्णन शॉपींग सेंटर, झाशी राणी चौक, मनपाजवळ, धुळे



# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२४३ ■ शनिवार ६ जुन २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.No./DHL/53/24-26



भतवाल हॉस्पिटल
म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर, मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711


## अकरा वर्षांत एक लाख ब्यण्णो हजार हेक्टर जंगल नष्ट झाले: मल्लिकार्जुन खरगेंचा दावा



**नवी दिल्ली, दि. ५ : जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केंद्रातील मोदी सरकारवर जोरदार टीका केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी नागरिकांना वाढत्या उष्णतेचा सामना करण्यासाठी प्रतिकात्मक उपाय सुचवत आहेत. पण, त्यांच्या सरकारच्या काळात हिंदुस्थानच्या पर्यावरणीय संपत्तीवर मोठ्या प्रमाणात आघात झाल्याचा आरोप त्यांनी केला. गेल्या अकरा वर्षांत देशभरात एक लाख ९२ हजार हेक्टर क्षेत्रातील जंगल नष्ट झाल्याचा दावा खरगे यांनी केला.**

एक्सवरील पोस्टमध्ये खरगे यांनी म्हटले की, आतापर्यंत अंदाजे एक कोटी ६० लाखांपेक्षा अधिक झाडे तोडण्यात आली आहेत. त्यामुळे सरकारचे पर्यावरण संरक्षणाचे दावे आणि प्रत्यक्षातील परिस्थिती यामध्ये मोठी तफावत आहे. देशभरातील विविध प्रकल्पांमुळे मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत आहे. अंदमान-निकोबारमधील ग्रेट निकोबार प्रकल्पामुळे सुमारे दहा लाख झाडी धोक्यात आली आहेत. मध्य प्रदेशात खाणकाम आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे सुमारे सात लाख झाडे नष्ट होत आहेत.

छत्तीसगडमधील हसदेव अरण्य कोळसा प्रकल्पामुळे सुमारे पाच लाख झाडे तोडली जाणार असून जैवविविधतेने समृद्ध असलेल्या परिसराला त्यामुळे मोठा फटका बसणार आहे. राजस्थानमध्ये विविध विकास प्रकल्पांमुळे दीड ते चार लाख झाडे धोक्यात आहेत. उत्तर प्रदेशात महामार्ग आणि द्रुतगती मार्गांच्या उभारणीसाठी सुमारे एक लाख झाडे तोडण्यात आली आहेत. आसाममध्ये गेल्या चार वर्षांत महामार्ग विस्तारासाठी सुमारे एक लाख झाडे तोडण्यात आली आहेत. ओडिशामधील भारतमाला प्रकल्पामुळे पन्नास हजार झाडांची कत्तल झाली आहे. महाराष्ट्रात किनारी रस्ता प्रकल्प आणि खाणकामामुळे सुमारे पंचेचाळीस हजार झाडांसह महत्त्वाच्या खारफुटी परिसंस्थेलाही फटका बसत असल्याचे त्यांनी म्हटले.

मोदी सरकार वनक्षेत्र वाढल्याचा दावा करत असले तरी इंडिया स्टेट ऑफ फॉरेस्ट रिपोर्टमध्ये वापरण्यात येणाऱ्या वनक्षेत्राच्या व्याख्येवरही खर्गे यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. उपग्रहांच्या आधारे **(पान ४ वर)**

## अंदमान बेटाजवळ वायूसाठा सापडला

नवी दिल्ली, दि. ५ : अंदमान बेटांच्या पुर्व किनारपट्टीपासून सुमारे पंधरा किलोमीटर अंतरावर श्री विजयपुरम-३ येथे नैसर्गिक वायूचा साठा सापडला आहे. याबाबत केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप पुरी यांनी आज वायू साठा सापडण्याचे जाहीर केले. या शोधामुळे अंदमान समुद्रातील ऊर्जेची प्रचंड क्षमता अधोरेखित झाली आहे.

अंदमान बेटांच्या पुर्व किनारपट्टीजवळ श्री. विजयपुरम-३ येथे नैसर्गिक वायूचा साठा सापल्यामुळे देशाला मोठा दिलासा मिळणार आहे. या संबंधी केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप पुरी यांनी सोशल मीडियावरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे की, या शोधामुळे अंदमान समुद्रातील ऊर्जेची प्रचंड क्षमता अधोरेखित झाली आहे. या क्षेत्रात सुरू असलेल्या शोध मोहिमेतील हे आणखी एक यश आहे. हा नैसर्गिक वायू ३५५ मीटर इतक्या खोलीवर सापडला आहे. एक हजार **(पान ४ वर)**

## जिथं ताकद तिथेच लक्ष केंद्रीत करा, विजय आपलाच असेल जि.प., पं.स.निवडणुकीसाठी खा.डॉ. श्रीकांत शिंदेंचा कानमंत्र



**तळोदा/नंदुरबार, दि.५- आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये जिथे ताकद आहे तिथेच लक्ष केंद्रीत करा, सूक्ष्म नियोजन करा, बूथ समन्वयक नियुक्त करा, विजय आपलाच असेल, असा कानमंत्र शिवसेना संसदीय पक्षाचे नेते संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना दिला.**

खासदार डॉ. शिंदे यांचा दोन दिवसांचा शिवसंवाद दौरा आज खान्देशातील नंदुरबारपासून सुरु झाला. खा.डॉ. शिंदे यांनी नंदुरबार आणि तळोदा येथे जिल्ह्यातील विधानसभा मतदार संघांचा आढावा घेतला. या बैठकीत ते बोलत होते. यावेळी मंत्री दादा भुसे, आ. आमशा पाडवी, आ.चंद्रकांत रघुवंशी, आ. राजेंद्र गावित, शिवसेना राज्य संघटक प्रमुख माजी खासदार आनंद परांजपे, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, शिवसेना नंदुरबार लोकसभा संपर्क प्रमुख माजी आमदार शिरीष चौधरी व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

खासदार डॉ. शिंदे यांनी आज सकाळी तळोदा येथे शहादा आणि अक्कलकुवा विधानसभा मतदार संघांचा आढावा घेतला. या बैठकीत खासदार डॉ. शिंदे यांनी मतदार यादी पुनरिक्षण मोहीम, बीएलए नियुक्ती आणि २० मतदार बूथमागे एका समन्वयकाची नियुक्ती करावी, असे निर्देश पदाधिकाऱ्यांना दिले. समन्वयक नियुक्त केल्यामुळे प्रत्येक बूथवरचा आढावा घेता येईल. बूथनिहाय काम केलं तर संघटना मजबूत होईल आणि निवडणुकीत विजयाची शक्यता वाढेल, असे खासदार डॉ. शिंदे म्हणाले.

खासदार डॉ. शिंदे पुढे म्हणाले की, आधीच्या निवडणुकीत काय झालं ते आता बाजूला ठेवा. जिल्हा परिषद गट, पंचायत समिती गणात शिवसेनेची ताकद कशी वाढेल, या **(पान ४ वर)**

## नैऋत्य मान्सून अखेर केरळमध्ये दाखल उत्तर महाराष्ट्रात वादळी पावसाचा अंदाज



तिरूअंतपुरम, दि. ५ : प्रतिक्षा असलेला नैऋत्य मान्सून अखेर केरळमध्ये दाखल झाला आहे. भारतीय हवामान विभागाने अधिकृतपणे केरळमध्ये मान्सूनचे आगमन झाल्याची घोषणा केली आहे. काही दिवसांचा विलंब झाल्यानंतर अखेर चार जूनला मान्सून केरळमध्ये दाखल झाला. हवामानतज्ज्ञांच्या मते, बंगालच्या उपसागरात कमी दाबाच्या क्षेत्रामुळे आणि अरबी समुद्रातील मोसमी वाऱ्यांमुळे मान्सूनच्या प्रगतीला चालना मिळाली. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे ढगांची घनता वाढली आहे. उत्तर महाराष्ट्रात नंदुरबार, नाशिक आणि जळगाव जिल्ह्यांत वादळी पावसाचा अंदाज आहे. कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून शेतकऱ्यांसह नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, संभाव्य हवामान बदल लक्षात घेऊन योग्य ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी. शेतकऱ्यांनी वादळी पावसावर अवलंबून राहून मान्सूनचे आगमन होण्यापूर्वी पेरणीची घाई करू नये. वीजांचा कडकडाट सुरू असताना नागरिकांनी स्वतःची तसेच पाळीव जनावरांची सुरक्षितता पहावी. झाडाखाली, पत्र्याच्या शेडखाली तसेच विद्युत ट्रान्सफार्मर, विजेचे खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ उभे राहणे टाळावे.

मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि दक्षिण महाराष्ट्रातील काही भागांमध्ये मान्सूनपूर्व सरींची शक्यता वर्तवण्यात आली आहे. विशेषतः सोलापूर, सांगली, कोल्हापूर आणि **(पान ४ वर)**

## धुळ्यात अवैध सावकार पिता-पुत्राविरुद्ध गुन्हा

धुळे, दि.५ - पाच टक्के व्याजदराने पैसे देत, वसुलीसाठी थेट ठार मारण्याची धमकी देणाऱ्या, संशयित पिता पुत्राविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात अवैध सावकारीचा गुन्हा दाखल झाला. परतफेड करूनही पैशांसाठी तगादा लावला.

इंजिनिअर भूषण बापूराव पाटील यांनी शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली, त्यानुसार त्यांनी जुगनू पंडित पाटील याच्याकडून २०१० मध्ये दोन लाख रुपये घेतले होते. त्यापोटी भूषण यांनी जुगनू पाटील यास पाच टक्के व्याजदराने २८ मे २०२६ पर्यंत वेळोवेळी रोख व बँकेद्वारे व्याजासह पैशांचा परतावा केला. मोठ्या प्रमाणात पसे परतफेड करुनही **(पान ४ वर)**



## धुळ्यातील विकासाबाबत खा.बच्छावांची ना.गिरीश महाजनांशी विविध विषयांवर चर्चा

**धुळे, दि.५ - धुळे लोकसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने खासदार डॉ. शोभाताई बच्छाव यांनी राज्याचे आपत्ती व्यवस्थापन तथा जलसंपदा मंत्री नामदार गिरीशभाऊ महाजन यांची मंत्रालयात प्रत्यक्ष भेट घेऊन विविध महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी धुळे जिल्ह्याशी निगडित आपत्ती व्यवस्थापन, सुलवाडे-जामफळ-कनोली उपसा सिंचन योजना आणि अक्कलपाडा धरणाच्या पूर्ण क्षमतेने कार्यान्वयनासंदर्भातील मागण्या मंत्री महाजन यांच्यासमोर मांडण्यात आल्या. सर्व विषयांवर मंत्री महाजन यांनी सकारात्मक भूमिका घेत आवश्यक कार्यवाहीचे आश्वासन दिले.**

खासदार डॉ. बच्छाव यांनी धुळे लोकसभा मतदारसंघासाठी सुमारे ३०० कोटी रुपयांच्या आपत्ती व्यवस्थापन प्रकल्पाचा प्रस्ताव राज्य शासनामार्फत राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण व केंद्र शासनाकडे सादर करण्यात यावा, अशी मागणी केली. धुळे शहरातील वाढते शहरीकरण, हवामान बदल, **(पान २ वर)**

## रावेर येथील तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

धुळे, दि.५ - रावेर (ता. धुळे) येथील एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी गावातील एका संशयिताविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल झाला. गावात बदनामी केल्याने आत्महत्या केल्याची फिर्याद कुटुंबीयांनी दिली.

विजय हिरालाल ठाकरे (वय २३) असे मृत तरुणाचे नाव आहे. काल (ता. ४) सकाळी सहाच्या सुमारास त्याने घराजवळील पत्र्याच्या छताला रूमालाच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे आढळले. याप्रकरणी भाऊ अजय हिरालाल ठाकरे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार त्यांचा भाऊ विजयचे एका तरुणीसोबत **(पान ४ वर)**

## कपिलेश्वर मंदीरास जाणारा पादचारी पूल सहा वर्षांपासून अर्धवट अवस्थेत पडून

**सोनगीर दि. ५(प्रतिनिधी)मुडावद ता. शिंदखेडा येथील ऐतिहासिक व प्रसिद्ध कपिलेश्वर मंदिर परिसरात भाविक आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी मंजूर करण्यात आलेल्या पादचारी पुलाचे काम गेल्या सहा वर्षांपासून अर्धवट अवस्थेत पडून आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे जनतेचे तब्बल पाच कोटी रुपये पाण्यात गेले असून, पावसाळ्याच्या तोंडावर हा अर्धवट पूल आता मृत्यूचा सापळा बनला आहे. या संदर्भात प्रशासनाने महिनाभरात योग्य पावले न उचलल्यास उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा इशारा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे नथू धनगर आणि मुडावद ग्रामस्थांनी दिला आहे.**



सदर पुलाचे काम सन २०१८-१९ मध्ये मंजूर झाले होते. सार्वजनिक बांधकाम विभागाने ठेकेदाराला दिलेल्या कार्यारंभ आदेशात स्पष्ट नमूद केले होते की, १२ महिन्यांत काम पूर्ण करावे आणि त्याआधी लागणारे जमिनीचे अधिग्रहण करून घ्यावे. मात्र, ठेकेदार आणि च्या अधिकाऱ्यांनी संगनमत करून नियम धाब्यावर बसवले. जमिनीचे कायदेशीर अधिग्रहण न करता आणि शेतकऱ्यांना मोबदला न देताच पुलाची उभारणी करण्यात आली. परिणामी, आता जमीन मालकाने काम रोखल्यामुळे गेल्या ६ वर्षांपासून पुलाचे काम रखडले आहे.पांझरा नदीवर बांधण्यात आलेल्या या पुलाला कुठेही संरक्षण जाळ्या किंवा कठडे बसविलेले नाहीत. नदीपात्रात खाली किमान १५ ते २० फूट खोल पाणी आहे. मंदिराच्या बाजूने पुलावर येता येते, मात्र मुडावद गावाकडील बाजूचे काम अपूर्ण असल्याने तेथे चढण्या-उतरण्याची **(पान २ वर)**

## भेसळयुक्त तेलसाठा मोहिदा येथून जप्त

नंदुरबार, दि.५(प्रतिनिधी)-अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने शहादा तालुक्यातील मोहीदा येथील एका किराणा दुकानावर छापा टाकून संशयित भेसळयुक्त ३२८ लिटर्स खाद्यतेल जप्त केले. जप्त करण्यात आलेल्या तेलाची किंमत सुमारे ५३ हजार १३६ रुपये असल्याची माहिती देण्यात आली आहे.

तपासणीदरम्यान रिफाइंड सोयाबीन तेल कोणत्याही अधिकृत ब्रँडिंग, पॅकेजिंग किंवा बॅच क्रमांकाविना खुल्या स्वरूपात विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचे आढळून आले. हे तेल मानवी वापरासाठी असुरक्षित, निकृष्ट दर्जाचे किंवा **(पान ४ वर)**

## काटवान परिसरासाठी लाटीपाडातून पाणी सोडा शेतकरी उत्पा. संघटनेचे तहसीलदारांना निवेदन

**पिंपळनेर, दि.५(प्रतिनिधी)-साक्री तालुक्यातील काटवान परिसरात भीषण पाणीटंचाई निर्माण झाल्याने लाटीपाडा व जामकी धरणातून पाणी सोडण्याची मागणी महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेने केली आहे. याबाबत तहसीलदार, साक्री यांना निवेदन देण्यात आले.**




निवेदनात म्हटले आहे की,काटवान परिसरातील अनेक विहिरींची पाणीपातळी मोठ्या प्रमाणात घटली असून काही विहिरींचा तळ गाठला आहे. त्यामुळे नागरिकांसह जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे ग्रामीण भागात पाणीटंचाई अधिकच वाढली असून शेतकरी व ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर लाटीपाडा धरणातून कालव्याद्वारे तसेच लाटीपाडा आणि जामकी धरणातून पांझरा नदीपात्रात तातडीने पाणी सोडण्यात यावे,अशी मागणी संघटनेने केली **(पान २ वर)**

## उपनगराध्यक्षांच्या पत्राची दखल घेतली न गेल्याने पुन्हा स्मरणपत्र

**शहादा,दि.०५(का.प्र.) - शहादा शहरातील वाढते अतिक्रमण, बेशिस्त पार्किंग, राँग साईड वाहतूक आणि अवजड वाहनांची घुसखोरी यामुळे संपूर्ण शहर वाहतूक कोंडीच्या विळख्यात सापडले आहे. या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शहादा नगरपालिकेच्या उपनगराध्यक्षा माधवी मकरंद पाटील यांनी मुख्याधिकारी आणि पोलीस प्रशासनाला स्मरणपत्र पाठवून तातडीने संयुक्त कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. उपमहापौरांच्या सुचनेची दखल घेतली जात नसल्याचे दिसते. त्यामुळे ते आंदोलनाचा पावित्रा घेतात का, केवळ स्मरणपत्रेच देत राहणार, याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.**



यापूर्वी दि.१५ मे रोजी दिलेल्या पत्रावर कोणतीही कारवाई न झाल्याने त्यांनी हे स्मरणपत्र दिले आहे. शहरातील महात्मा फुले चौक ते श्रेयस हॉस्पिटल, स्टेट बँक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, चार रस्ता ते सोनार गल्ली आणि महात्मा गांधी पुतळा ते बागवान गल्ली या मुख्य मार्गांवर वाहतुकीची दुरवस्था झाली आहे.वन-वे रस्ते असूनही वाहनचालक राँग साईडने बिनधास्त वाहने चालवत आहेत. मुख्य रस्त्यांवर अवजड वाहनांचा प्रवेश सुरूच आहे.धक्कादायक बाब म्हणजे स्वतः शहादा नगरपालिका कार्यालयासमोरच नॉनव्हेज व अंडाकरी विक्रेत्यांनी रस्त्यालगत व्यवसाय थाटल्याने तेथे दुर्गंधी, अस्वच्छता आणि कोंडी निर्माण झाली आहे. यामुळे प्रशासनाच्या प्रतिमेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. मुख्य रस्त्यांवर आंबे, फळ, चप्पल, थंड पेये आणि खाद्यपदार्थांच्या गाड्यांनी अतिक्रमण केल्यामुळे नागरिक, महिला, विद्यार्थी आणि रुग्णवाहिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. व्यवसाय करण्याचा अधिकार सर्वांना आहे, परंतु सार्वजनिक रस्ते अडवून नागरिकांना वेठीस धरणे अयोग्य आहे. आजच योग्य पावले उचलली नाहीत, तर भविष्यात मोठे अपघात घडू शकतात, अशी प्रतिक्रिया उपनगराध्यक्षा माधवी पाटील यांनी व्यक्त केली आहे.

## कॉक्रोच जनता पार्टी अॅड.भंडारींचा इशारा

धुळे, दि.५ - सध्या कॉकोच जनता पार्टीचे ऑनलाईन फॉलोअर्स वेगाने वाढत आहे आणि याचाच फायदा घेण्याची सुरुवात सायबर गुन्हेगारांनी केलेली आहे. एखादया व्यक्तीला त्याच्या व्हॉटस ॲप किंवा सोशल मिडीयाच्या माध्यमातून तुम्हाला जर कॉकोच जनता पार्टीबद्दल माहिती हवी असेल किंवा आपणास त्यांच्या सोशल मिडीया अकौंटला फॉलो करायचे असतील तर खाली दिलेल्या लिंकवर क्लिक करा व सदरील लिंक क्लिक करताच आपले व्हॉटस ॲप खाते, अकौंट हॅक होते. त्यामुळे काळजी घ्यावी असा सल्ला ॲड.भंडारी यांनी दिला आहे.

## शिरपूर वरवाडे नगर परिषदेतर्फे जागतिक पर्यावरणदिनी चिंतन पटेलांच्याहस्ते वृक्षारोपण

**शिरपूर, दि.५(प्रतिनिधी)-शिरपूर वरवाडे नगर परिषदेतर्फे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त लोकनियुक्त नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.**



जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ५ जून रोजी देशभरात 'एक पेड माँ के नाम' अभियानांतर्गत मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी, मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या आवाहनानुसार सुरू झालेल्या या अभियानाचा उद्देश असून मातृत्वाचा सन्मान करण्यासोबतच पर्यावरणाचे रक्षण करणे हा आहे.

या अभियानाच्या अनुषंगाने शिरपूर-वरवाडे नगर परिषदेतर्फे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम दादा पावरा, प्रियदर्शिनी सहकारी सूतगिरणीचे चेअरमन तथा शिरपूर वरवाडे नगर परिषदेचे गटनेते भूपेशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल यांच्या हस्ते वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांनीही विविध प्रकारची रोपे लावून पर्यावरण रक्षणाची सामूहिक जबाबदारी स्वीकारली.

यावेळी लोकनियुक्त नगराध्यक्ष तथा भाजपा **(पान २ वर)**

## आदि. भील समाजाची धडगावला महापंचायत

नंदुरबार, दि.५ (प्रतिनिधी)-आदिवासी भील समाजाचा इतिहास अत्यंत गौरवशाली आणि समृद्ध संस्कृतीचा राहिला आहे. समाज परिवर्तनाची ही नवी पहाट अधिक व्यापक करण्यासाठी आता विविध स्तरांवर जाहीर बैठकांचे सत्र आयोजित करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून ७जून रोजी मोलगी/धडगाव परिसरातील प्रतिष्ठित व सुजाण नागरिकांची महत्त्वाची नियोजन बैठक होणार आहे, तर ८ जून रोजी धडगाव येथे निर्णायक महापंचायत पार पडणार आहे. महत्वपूर्ण निर्णयांसाठी या महापंचायतीकडे आता संपूर्ण भील समाजाचे डोळे लागले आहेत.


दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,40,600 रु.+3% GST
सोने- 24 K -1,53,500 रु.+3% GST
चांदी- 2,61,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३




सेंद्रिय जांभुळ
संकेत नित्या फार्मचे
उत्कृष्ट सेंद्रिय जांभुळ
उपलब्ध
✽ संपर्क ✽
वेळ : सकाळी ११ ते रात्री ८ वाजेपर्यंत
दै.आपला महाराष्ट्र कार्यालय
वीर सावरकर मार्ग-धुळे. ०२५६२-२३५३९६, २३८३९६


## हरित धुळे करण्यासाठी लोकचळवळ बनविणे आवश्यक-आ.अनुप अग्रवाल



धुळे, दि.५ - धुळे शहराच्या सर्वांगीण विकासासोबतच पर्यावरण संवर्धनालाही प्राधान्य देणे आवश्यक आहे. त्यासाठी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत आजपासून हरित धुळे अभियानाला प्रारंभ झाला आहे. हे अभियान केवळ एका दिवसापुरते मर्यादित न राखता संपूर्ण धुळे शहरात व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे. हरित धुळे ही केवळ शासन किंवा महापालिकेची मोहीम न बनता ती आता लोकचळवळ बनावी. यासाठी प्रत्येक धुळेकर नागरिकाने आपल्या घरासमोर, परिसरात किंवा उपलब्ध मोकळ्या जागेत किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करत योगदान द्यावे, असे आवाहन शहराचे आमदार अनुपभय्या अग्रवाल यांनी केले. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आ.अग्रवाल यांच्या संकल्पनेतील धुळे शहराला अधिक हिरवेगार, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक बनविण्याच्या उद्देशाने हरित धुळे या महत्त्वाकांक्षी अभियानाचा प्रारंभ प्रभाग १८ मधील लोकरे नगरमध्ये झाला. यावेळी आमदार अग्रवाल, महापौर मायादेवी परदेशी, महापालिका आयुक्त नितीन कापडणीस आदींच्या हस्ते वृक्षारोपण करून अभियानाची औपचारिक सुरवात झाली.

## पैसे दुप्पटचे आमीष दाखवून फसवणारी टोळी गजाआड

**धुळे, दि.५- पैसे दुप्पट करण्याचे आमीष दाखवून शिक्षकासह मित्राची लुटमार केल्याप्रकरणी निजामपूर पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून सहा लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त केला.**

खोरी (ता.साक्री) शिवारातील पवन चक्कीच्या टॉवरजवळ अनोळखी १२ ते १४ जणांनी शिक्षक अनिल उमरावसिंह बोडाणा, (वय ३५) रा. रुपाखेडी, ता. तराणा जि. उज्जैन, म.प्रदेश व मित्राला गळयाला चाकु लावून फोन पेद्वारे पैसे जबरदस्तीने ट्रान्सफर करुन घेतले. त्यांचेकडुन रोकड, चांदीची चैन, चार्जर असा एकुण एक लाख चौदा हजार दोनशे रूपयांचा मुद्देमाल लुटला. त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन ठार मारण्याची धमकी दिली. ३० मेस पहाटे पुर्वी घटना घडली होती. निजामपूर पोलीस ठाण्यात दरोडयाचा गुन्हा दाखल आहे.

निजामपुर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी मयुर भामरे यांनी तांत्रिक विश्लेषण व गोपनिय माहितीचे आधारे पोलीस पथक रवाना केले. पथकाने संशयित मुकेश प्रकाश भामरे (वय-३५) रा.भामेर ता. साक्री, जोगलेश लली चव्हाण (वय-२०) नागेश नवशा चव्हाण (वय-२१) दोघे रा. जामदा ता साक्री यांना ताब्यात घेऊन त्यांची कसून चौकशी केली. चौकशीअंती संशयितांनी गुन्हयाची कबुली दिली. संशयितांकडून हातातील चंदेरी कडे, ३० हजारच्या कानातील दोन रिंगा, १५ हजारचा पिवळया धातुचा तुकडा, स्टिलचा रॉड, आठ हजार रुपयांचे पैसे मोजण्याचे मशिन, बटनाचा चाकू, ७८ हजार रुपयांचे तीन मोबाईल, नकली नोटांचे बंडल असा एकुण ६ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल तिघा संशयीतांकडुन जप्त केला. त्यांना अटक करुन न्यायालयात हजर केले असता दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

# आपला महाराष्ट्र

## देश आणि महाराष्ट्रातील राजकारणाचे अश्वस्थ वर्तमान

राज्याच्या आणि केंद्रस्थानी असलेल्या पक्षाच्या नेतृत्वाने देशभर स्वत:चे जाळे प्रस्थापित करण्यासाठी हर प्रकारचे प्रयतक केलेले आहेत. पश्चिम बंगालचा प्रयोग हे त्याचे ताजे उदाहरण म्हणावे लागेल. ममता बॅनर्जी यांचा तृणमूल काँग्रेस हा पक्ष पूर्णपणे संपविण्याचा विडा या पक्षाने उचलला आहे. बॅनर्जी यांच्या पक्षातील ५० हून अधिक आमदारांनी बंडखोरी करून बंडखोर नेत्याला विरोधी पक्षनेते पदी विराजमान केले आणि त्यास विधानसभेच्या अध्यक्षांनी ताबडतोब मान्यता दिली. या संदर्भात जर तृणमूल काँग्रेस न्यायालयात गेली तर महाराष्ट्रातील राजकीय खटला ज्याप्रमाणे प्रलंबित आहे त्याप्रमाणे हाही खटला त्याच पद्धतीने प्रलंबित ठेवला जाईल याचीही खात्री शासक पक्षाला आहे. याचा अर्थ तशी व्यवस्था या पक्षाने करून ठेवलेली आहे. यापूर्वी मायावतीचा पक्ष असेल, वाय एस आर काँग्रेस असेल, एडिएम के असेल, नितीश कुमार यांचा बिहार मधील पक्ष असेल, हरियाणातील चौटाला यांचा पक्ष असेल अशाप्रकारे ज्या ज्या ठिकाणी प्रादेशिक पक्षांची सोबत घेऊन केंद्रस्थानी असलेल्या पक्षाने आपल्या राजवटी प्रस्थापित केल्या. आणि नंतर हळूच प्रादेशिक पक्ष संपविले. तोच प्रयोग जम्मू–काश्मीर मध्ये देखील झाला. थोडक्यात देशातील जातीय, धार्मिक, आर्थिक, सामाजिक पातळीवर जे अस्वस्थ वर्तमान आहे तसेच वर्तमान राजकीय क्षेत्रात देखील आहे. पण यावर देशातील जनता फारसा गांभीर्याने विचार करीत नाही हा मुख्य मुद्दा आहे. म्हणजे देश नासवला जात असला तरी हरकत नाही आम्हाला फुकटचे मिळते आहे ना तेवढे पुरेशे आहे. अशी धारणा लोकांची झाली असून अशा लोकांना निष्क्रिय करून आपला उद्देश सफल करण्याचे उद्योग शासक पक्षाने जाणीवपूर्वक यशस्वी केलेले आहेत. ही टीका भक्तांना खटकणारी जरूर असेल कारण त्यांनी आपल्या डोळ्यावर कातडे ओढून घेतलेले आहे. आपल्या नेत्यांची प्रत्येक कृती ही त्यांना गोड वाटते त्यामुळे त्यांना समर्थन करण्या वाचून दुसरा पर्याय नाही. सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आयुष्यभर ज्या काँग्रेसमध्ये राहून ज्यांनी चार चार पिढ्यांची व्यवस्था करून ठेवली त्यांना केवळ एका नोटीस ची भीती दाखवून या पक्षाने आपल्याकडे ओढवून घेतले त्यांचे अपराध पोटात घेतले, त्यांना क्लीन चिट दिली, एवढेच नव्हे तर पदे आणि प्रतिष्ठा दिली. त्यांच्या हातात कारभार दिला. म्हणजेच चोरांच्या हातात तिजोरीच्या चाव्या दिल्या. आज अशाच प्रकारचे लोक शासक पक्षाच्या केंद्रस्थानी आणि राज्यातही आघाडीवर आहेत.

अशाच प्रकारचे राजकारण खेळायचे असते असा एक विचार देखील यासोबत या पक्षाने प्रस्थापित केलेला आहे. महाराष्ट्राच्या राजकारणाची तर त्यांनी अतिशय दैना करून टाकलेली आहे. त्यांच्या जोडीला पक्ष फोडून सत्तेत आणलेले जे काही नेतृत्व आहे त्यांना पुढच्या काळामध्ये लोकांमध्ये तोंड दाखवायला जागा राहणार नाही अशा पद्धतीचा त्यांचा चेहरा बनविण्याचे काम देखील शासक पक्षाने उत्तम पद्धतीने केलेले आहे. प्राप्त परिस्थितीत या दोन पक्षांना शासक पक्षाशी जुळवून घेताना जे जे काही अनिष्ट असेल ते सगळे पचवून हाच खरा राजकारणाचा चेहरा आहे असा विचारही स्वीकारावा लागत आहे. त्यांचे दोर कापलेले असून. त्यांच्या परतीचे मार्ग बंद झालेले आहेत. त्यांनी स्वत:हून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला तरी लोक त्यांना स्वीकारतील अशी शक्यता आता नाही. जर लोकांनी स्वीकारले तर लोकांचीच नीतिमत्ता फिरली आहे असे समजावे. याचा अर्थ सार्वजनिक जीवनात जी नैष्ठिक भूमिका लागते तीच संपुष्टात आणण्याचे षडयंत्र महाराष्ट्रात रचून त्याचे पुरोगामीत्व इतिहास जमा करण्याचे प्रयतक जारी आहेत. प्रसिद्धी माध्यमे नीतिमत्ता धाब्यावर बसवून राज्यकारभार चालवणाऱ्यांच्या सोबत आहेत त्यामुळे लोकांचे जे प्राधान्यक्रमाचे प्रश्न आहेत त्यांना प्रसिद्धी मिळत नाही मात्र शिवसेना शिंदे गटात काय चालले आहे, त्यांनी कुठली भरारी घेतली आहे, सुनेत्रा पवार यांच्या गटात काय चालले आहे, त्यांनी काय कामगिरी बजावलेली आहे या संबंधातील सगळ्या बातम्यांचा रतीब प्रसिद्धी माध्यमे घालत आहेत. अतिरेक झाल्यामुळे असंख्य लोकांनी बातम्यांच्या वाहिन्या बंद करून टाकलेल्या आहेत. याचाच अर्थ स्पष्ट आहे की माध्यमांची विश्वासार्हता संपुष्टात आलेली दिसते. विधान परिषदेच्या निवडणुकीत पाच जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आल्याच्या बातम्या सर्वत्र प्रसारित होत आहेत. या पक्षांना आपले उमेदवार बिनविरोध निवडून आणण्याचा अत्यानंद झालेला असेल. परंतु त्यांचे निवडून आलेले उमेदवार हे गडगंज पैसेवाले असून ठिकठिकाणी उभ्या असलेल्या विरोधकांच्या उमेदवारांनी ऐनवेळी माघार घेतल्यामुळे महायुतीच्या उमेदवारांचा मार्ग प्रशस्त झालेला आहे.

वर्धा चंद्रपूर गडचिरोली मतदारसंघातून भाजपचे उमेदवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या नेत्या सुप्रिया सुळे यांचे भावी व्याही लाखानी हे बिनविरोध निवडून आले. त्यांच्या विरोधातील काँग्रेस उमेदवाराने माघार घेतली. छत्रपती संभाजी नगर मध्ये शिवसेना ठाकरे गटाच्या देवयानी डोणगावकर यांनी माघार घेतली. त्यांची पक्षाने हकालपट्टी केली. त्यांनी सत्ताधारी पक्षाच्या उमेदवाराचा मार्ग मोकळा केला आहे.त्या धुळ्याच्या कन्या आहेत. एकंदर आठ मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी माघार घेतल्यामुळे. शासकांना दिलासा मिळाला. जरी महाविकास आघाडीकडे पुरुष संख्याबळ नव्हते तरीपण निवडणूक बिनविरोध होऊ द्यायची नाही असे महाविकास आघाडीने ठरविले होते. पण त्यांचे उमेदवार कच्चे निघाले आणि ते विकले गेल्याचा आरोप होत आहे. दिल्लीतून गडगंज संपत्ती महानगरपालिका आणि नगरपरिषदांच्या निवडणुकीसाठी ठिकठिकाणी रवाना झाली. त्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांचा ताबा शासक पक्षाने घेतला. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार संघात त्यांचेच बळ मोठे आहे. परिणामी त्यांचे उमेदवार सहज निवडून येण्याचा मार्ग मोकळा झालेला होताच परंतु आपल्यासमोर उमेदवार तरी कशाला हवा म्हणून त्यांना फोडले. अशाप्रकारे महाविकास आघाडीला धक्का पोहोचलेला दिसतो . त्या त्या उमेदवारांना खरेदी केल्याचा आरोप पक्षश्रेष्ठींनी केलेला आहे. वर्धा चंद्रपूर मतदारसंघात काँग्रेस उमेदवाराने माघार घेताना पक्षश्रेष्ठींवर आरोप केले आणि संख्याबळ पुरेसे नसताना उमेदवारी दिली त्यामुळे लढण्यात काही अर्थ नव्हता म्हणून माघार घेतली असा खुलासा केला. त्यावर एकनाथ शिंदे यांच्या पक्षाच्या आमदाराने सवाल केला की संख्याबळ नसल्याने उमेदवाराने माघार घेतली मग पैशांचा आरोप कसा काय करता? मात्र पुरेसे संख्याबळ नसल्याचे कारण दाखविण्याचे आधीच ठरले असावे हे कदाचित प्रश्नकर्त्या आमदाराने लपवून ठेवले असावे. मुद्दा असा आहे की, अशाप्रकारे उलटे सुलटे खपवून राजकारण करणाऱ्यांची सध्या महाराष्ट्रात मांदियाळी आहे. केंद्रातही तसेच आहे. तिथे तर नेतृत्वाला देवत्व प्रदान करण्यात आलेले आहे. बाकी ठिकाणी लढती होणार आहेत त्याचे निकाल जे काय असतील ते पुढे येतील. मात्र महाराष्ट्र राजकीय दृष्ट्या पूर्णपणे नासावला गेला हे उघड आहे. ज्यांना शासक पक्षा सोबत राहण्यात अपरिहार्यता वाटते त्यांचे दिवस येत्या दोन वर्षात पूर्णपणे भरतील. कारण त्यांची उपयोगिता संपणार आहे. जनाधार असलेले नेते म्हणूनही त्यांची ओळख नसल्यामुळे पुढच्या काळात ते महाराष्ट्रातील जनतेसमोर टिकणार नाहीत. पर्यायाने त्यांच्या नशिबी क्षेत्र संन्यास घेण्याची वेळ येणार आहे. तसे तर ते गुवाहाटी पासूनच बदनाम आहेत. त्या सर्व अनैतिक प्रक्रियेला ते नीतिमत्ता मानतात यातच सर्व काही आले. पक्ष फोडून सत्तेत ते आलेले असले तरी त्यांची सत्ता म्हणजे अळवा वरचे पाणी म्हणावे लागेल. दुसऱ्या बाजूने मूळ पक्ष म्हणून जे दोन पक्ष उरलेले आहेत त्यांनीही गेल्या फुटी पासून जनमानसात रुजण्याचे कुठलेही प्रयतक केले नाहीत. त्यामुळे ते देखील संपुष्टात येतील. परिणामी महाराष्ट्रातील राजकीय क्षेत्रात आणखी अस्वस्थता निर्माण होणार आहे. ती कधीच दूर होऊ शकणार नाही. कारण त्यास नैतिकतेचे पाठबळ नाही. अशाप्रकारे देशासोबतच महाराष्ट्रातील राजकारणाचे वर्तमान अस्वस्थ असून ते राज्याला अधोगतीकडे निश्चितपणे नेणार आहे. यातून राज्याची सुटका करावयाची असेल तर आम जनतेनेच ती बाब मनावर घेतली पाहिजे. अन्यथा महाराष्ट्राचे काही खरे नाही.

धुळे, दि.५- शहरातील गणपतीमंदिर ते संतोषी माता मंदिरा पर्यंतच्या रस्त्याची दुरवस्था झाल्याने दुरूस्तीची मागणी होत आहे.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या टायटल जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे महिंदळे येथील स. नं. १०६/१अ२/अ/१ व १०६/१अ२/अ/२ व १०६/१अ/२ब (संगणकीकृत ७/१२ उताऱ्याप्रमाणे स. नं. १४१) पैकी प्लॉट नं. ५९ चे एकूण क्षेत्र १७२.५० चौ. मी. बखळ प्लॉट.

यासी चतु:सिमा

पुर्वेस : ९ मी. रस्ता
पश्चिमेस : प्लॉट नं. ५८
दक्षिणेस : ९ मी. रस्ता,
उत्तरेस : स. नं. १०६/१अ–१

येणेप्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल यांनी मिळकतीचे मालक श्री. अमित दिलीप ठक्कर, श्री. शिरीष चुनीलाल वाणी व श्री. सुबोध गणेश शर्मा रा. धुळे यांचेशी कायम खरेदी करणेचा सौदा केलेला आहे व बयाणा रक्कम दिलेली आहे.

सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा करार, बक्षिस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी, विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. टपाल व फोनवर तसेच परस्पर वर्तमानपत्रात दिलेल्या हरकती मान्य होणार नाही. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही. तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन त्यांचे वतीने आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. ०५/०६/२०२६

**ॲड.रोहित राजकुमार छाबिडया**
ब्लॉक नं. आर/२, रुम नं. १,
कुमारनगर, साक्री रोड, धुळे
मो. ९९२२८२८८८३/७४९९९९८९५५

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात, येते की,

**मिळकतीचे वर्णन-** मौजे गोंदूर, ता.जि. धुळे येथील सर्व्हे नं.६८/१ यापैकी प्लॉट नं.९ चे क्षेत्र १९४.७५ चौ.मी. यासी चतु:सिमा–

पुर्वेस :– प्लॉट नं.१२,
पश्चिमेस :– ९ मीटर रस्ता,
दक्षिणेस :– प्लॉट नं.८
उत्तरेस :– प्लॉट नं.१०.

येणेप्रमाणे वरील वर्णनातील बखळ प्लॉट भिमराव उखा पवार, रा.कालीकादेवी यांचे नगर, गोळीबार टेकडी रोड धुळे यांच्या मालकीचे व कब्जे उपभोगातील असून यांचे कडून आमचे अशील संतोष बारकु पाटील रा. मु.पो.भोकर ता.जि.धुळे यांनी कायम स्वरूपी विकत घेण्याचा सौदा केलेला असून सदर सौद्यापोटी आमचे अशिलांनी बयाणापोटी रक्कम देखील दिलेली आहे. तरी सदर बखळ प्लॉट संदर्भात कोणाचेही कुठल्याही प्रकारचे संबंध, हक्क, गहाण, तारण, करार, टाच, बक्षिस, दावा, अर्जफाटे, हितसंबंध, तक्रार अथवा हरकत असेल तर त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी व कागदोपत्री पुरावा दाखवून प्रत्यक्ष भेटून शहानिशा करून खात्री करून द्यावी. अन्यथा उक्त मुदतीत कोणाचीही हरकत, तक्रार न आल्यास सदर बखळ प्लॉट निर्बोज, निर्वेध समजून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा अथवा तक्रारींचा विचार केला जाणार नाही. तसेच मोबाईलद्वारे, पोस्टाद्वारे तसेच परस्पर वर्तमान पत्रात घेण्यात येणाऱ्या हरकती ते आमच्या अशिलांवर व सदर बखळ प्लॉट वर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. सदरची जाहिर नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती, अधिकार व सांगण्यावरून त्यांचेतर्फे आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक:– ०५/०६/२०२६.

**ॲड.अमित अशोक वाघ**
नोटरी (भारत सरकार)
२२, ''श्रीराम वाटीका'', मधुबन कॉलनी, वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे.
मो.नं.९८२३१३६००७


प्रकाश में आज

दृश्यम




अजय देवगण, तब्बु, श्रिया सरण, रजत कपुर, अक्षय कुमार


### पान १ वरुन

## खा.बच्छावांची ना.महाजनांशी विविध विषयांवर चर्चा

अतिवृष्टी व पूरस्थिती यांचा विचार करून आपत्ती व्यवस्थापनाची यंत्रणा अधिक सक्षमकरण्यासाठी हा प्रस्ताव महत्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. या संदर्भात केंद्र शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद प्राप्त झाल्याची माहितीही त्यांनी मंत्री महाजन यांना दिली.

तसेच शिंदखेडा तालुक्यासाठी जीवनदायिनी ठरणाऱ्या सुलवाडे-जामफळ-कनोली उपसा सिंचन योजनेअंतर्गत जामफळ धरणाच्या गाभा भरावासाठी आवश्यक काळ्या मातीचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे काम ठप्प झाल्याची बाब त्यांनी निदर्शनास आणून दिली. तांत्रिकदृष्ट्या योग्य माती दूरच्या भागांतून आणण्यासाठी आवश्यक असलेल्या अतिरिक्त वहन अंतरामुळे निर्माण होणाऱ्या वाढीव आर्थिक दायित्वाच्या प्रस्तावास तातडीने प्रशासकीय मान्यता देण्यात यावी तसेच आवश्यक असल्यास त्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर मंजुरीसाठी सादर करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली. यामुळे धरणाचे रखडलेले काम पुन्हा वेगाने सुरू होऊन परिसरातील हजारो शेतकऱ्यांना लाभ मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले. याचबरोबर धुळे जिल्ह्याच्या पाणीपुरवठा व सिंचन व्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या अक्कलपाडा धरणासंदर्भातही खासदार बच्छाव यांनी सविस्तर निवेदन सादर केले. सध्या धरण केवळ ६५ टक्के क्षमतेने भरले जात असून उर्वरित पाणी वाया जात असल्याने धरण १०० टक्के क्षमतेने भरण्यासाठी आवश्यक हेक्टर जमीन अधिग्रहणासाठी सुमारे २०० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून घेण्याकरिता राज्य शासनामार्फत केंद्र शासनाच्या जलशक्ती मंत्रालयाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा व सदर प्रकल्पाचा केंद्र पुरस्कृत योजनांमध्ये समावेश करण्यासाठी पाठपुरावा करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली. खासदार डॉ. शोभाताई बच्छाव यांनी मांडलेल्या सर्व विषयांची गांभीर्याने दखल घेत मंत्री गिरीशभाऊ महाजन यांनी संबंधित विभागांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येतील तसेच केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

## काटवान परिसरासाठी लाटीपाडातून पाणी सोडा

आहे. नदीपात्रात पाणी उपलब्ध झाल्यास परिसरातील विहिरींची पाणीपातळी वाढण्यास मदत होईल व नागरिक तसेच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची समस्या काही प्रमाणात कमी होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यासंदर्भात पाटबंधारे विभागाला आवश्यक निर्देश देऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी विनंतीही तहसील प्रशासनाकडे करण्यात आली आहे. यावेळी महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे धुळे जिल्हा संपर्क प्रमुख प्रा.युवराज दशरथ काकुस्ते, गिरीश नेरकर, हर्षल ठाकरे, उमाकांत अहिरराव, चंद्रशेखर अहिरराव यासह इतर कांदा उत्पादक शेतकरी यांनी प्रशासनाने तातडीने दखल घेऊन परिसरातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात,अशी मागणी केली.

### पान १ वरुन

## सहा वर्षांपासून अर्धवट अवस्थेत पडून

सोय नाही. मुडावद गावाच्या बाजू पूल जिथून सुरू होतो तेथील शेतमालकाने शेती संपादित होत नाही तोपर्यंत शेतातून जाण्यासाठी रस्ता देणार नाही असा पवित्रा घेतल्याने पुलाचे काम अपूर्ण आहे. दरम्यान,स्थानिक नागरिकांच्या सोयीसाठी एका दुकानदाराने स्वखर्चाने येथे एक लोखंडी शिडी बसवली आहे. परंतु, या शिडीला सुरक्षित कठडे नसल्याने १५ वर्षांखालील मुले आणि वृद्धांना येथून प्रवास करणे अशक्य झाले आहे. महाशिवरात्री यात्रेदरम्यान २१ दिवस येथे महाराष्ट्रभरातून लाखो भाविक येतात. त्या काळात होड्यांमध्ये क्षमतेपेक्षा तिप्पट प्रवासी भरले जातात. येथे कधीही मोठी दुर्घटना घडण्याची दाट शक्यता असून, अशी दुर्घटना घडल्यास त्याला जिल्हा प्रशासन आणि सार्वजनिक बांधकाम विभागच जबाबदार राहील, असा संतप्त इशारा गावकऱ्यांनी दिला आहे.

नथू धनगर यांनी माहिती अधिकारांतर्गत पुलाच्या कामाची माहिती मागितली असता, उप अभियंता यांनी अर्धवट माहिती दिली. पूर्ण माहिती मागितली असता, प्रथम अपील दाखल करा असे सांगून वेळकाढूपणा केला जात आहे. कपिलेश्वर मंदिर पादचारी पुलावरून येण्या-जाण्यासाठी तात्पुरता पर्याय म्हणून दोन्ही बाजूला लोखंडी कठडे (रेलिंग) असलेला जीना तत्काळ बसवण्यात यावा. पुलाचे अर्धवट राहिलेले काम तात्काळ युद्धपातळीवर सुरू करून पूर्ण करावे. जिल्हा प्रशासनाने वेळ न दवडता पुलाचे काम तत्काळ सुरू करावे. एका महिन्यात काम सुरू न झाल्यास गावातील नागरिक, परिसरातील रहिवासी आणि भाविकांच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात येईल. या न्यायालयीन लढाईचा संपूर्ण खर्च जबाबदार अधिकारी आणि ठेकेदाराकडून वसूल करण्यात येईल, याची नोंद प्रशासनाने घ्यावी असा इशारा नथू धनगर व समस्त मुडावद ग्रामस्थांनी प्रशासनाला दिला आहे.

## पर्यावरणदिनी चिंतन पटेलांच्याहस्ते वृक्षारोपण

शहराध्यक्ष चिंतनभाई अमरिशभाई पटेल, उपनगराध्यक्ष सौ. संगीता देवरे, बांधकाम सभापती वासुदेव देवरे, शिक्षण सभापती शामकांत ईशी, श्री बालाजी संस्थान ट्रस्टी भालेराव माळी, नगरसेवक इरफान मिर्झा, नगरसेविका सौ. मीनाक्षी पंडित पाटील, नगरसेविका सौ.अमृता मनोज महाजन, नगरसेवक राजसिंह सिसोदिया, नगरसेवक अमोल राजपूत, नगरसेवक आशिष पाटील, मुख्याधिकारी प्रशांत सरोदे, उपमुख्याधिकारी हर्षल भामरे, प्रशासकीय अधिकारी संजय हासवानी, नगरसेवक माधवराव पाटील, अभियंता अभिजित इनामदार, उद्यान विभाग प्रमुख सागर कुलकर्णी, पंकज महाजन, सुमित सांगळे, सोमनाथ बोराडे, विवेक ब्राह्मणकर, सागर ओतारी, विनायक कोळी, राज भोई व अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते देखील वृक्षारोपण करण्यात आले.

## पेरणीपूर्व कामांना वेग

धुळे, दि.५- हवामान खात्याच्या अंदाजानुसार मान्सुनच्या आगमनाची तयारी झाल्याने शेतकऱ्यांनी मशागतीच्या कामाला वेग दिला आहे.

पेरणीसाठी लागणारे बियाणे, शेतीपयोगी किरकोळ साहित्य खरेदीसाठी शेतकऱ्यांची लगबग सुरू झाली असून शेतात पेरणीपूर्व मशागतीची कामे वेगात पूर्ण करण्यासाठी मजुरांची जुळवाजुळव करण्यात शेतकरी मशगुल झाला आहे. पावसाच्या दमदार हजेरीची शेतकरी वाट पाहत असल्याने कामांना गती आली आहे.

### NAME CHANGE

MY OLD NAME WAS
**QAZI SHAFIQUE AHMED NASIMUDDIN**
MY NEW NAME IS
**SHAFIQUE AHEMED NASIMODDIN QAZI**
ADD- RAZA COLONY
PLOT NO.83, DHULE DIVERTION ROAD, DONDAICHA DIST DHULE. MAHARASHTRA 425408

## शिरपूर-वरवाडे नगरपरिषद, शिरपूर, जि.धुळे

### जाहीर निविदा सूचना

जा.क्र. आस्था/०९०३/२०२६
दिनांक ०५/०६/२०२६

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय क्र. जमीन–२०२६/प्रा.क्र.२०/जमीन–१, दिनांक २५/०३/२०२६ अन्वये तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करण्याबाबत प्राथमिक प्रस्ताव तयार करून संबंधित कार्यालयास सादर करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

सदर कामकाजासाठी मानधन तत्त्वावर (मक्ता पद्धतीने/कंत्राटी पद्धतीने) आवश्यक मनुष्यबळ पुरविण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदार/मनुष्यबळ पुरवठादार यांच्याकडून दोन लिफाफा पद्धतीने (तांत्रिक व वित्तीय) मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

आवश्यक मनुष्यबळाचे तपशील :

| अ.क्र. | शैक्षणिक पात्रता | संख्या |
|---|---|---|
| १ | BCA / B.Sc. (Computer Science ) / BCS | ५ |
| २ | Civil Engineering Diploma | २ |
| एकूण | | ७ |

इच्छुक व पात्र मक्तेदारांनी जाहीर निविदा प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ७ (सात) दिवसांच्या आत आपली मोहरबंद निविदा शिरपूर–वरवाडे नगरपरिषद, शिरपूर येथील आस्थापना विभागाकडे सादर करावी.

निविदेच्या अटी व शर्ती नगरपरिषदेच्या आस्थापना विभागात कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळतील. निविदेसंदर्भात अधिक माहिती आवश्यक असल्यास आस्थापना विभागाशी संपर्क साधावा.

प्राप्त निविदांपैकी कोणतीही निविदा कोणतेही कारण न देता स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी, शिरपूर–वरवाडे नगरपरिषद, शिरपूर यांनी राखून ठेवलेला आहे.

सही/-
मुख्याधिकारी
शिरपूर वरवाडे नगरपरिषद

### जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो., ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात**

दि.कि.अर्ज नं.४५९/२०२६, नि.०७,

१) धनराज बळीराम सोनवणे, २) संजय बळीराम सोनवणे,
३) रेखाबाई सुरेश माळी, ४) कमलबाई रमेश माळी,
५) संगीताबेन छबीलालभाई माळी ....अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही ....जाबदेणार

ज्याअर्थी मयत कै.बळीराम मंजी माळी व कै.लक्ष्मीबाई बळीराम माळी हे मौजे– अजंदे खु, ता.शिरपूर, जि.धुळे येथे मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेगयुलेशन अधिनियम १८२७, कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि.२२/०६/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून, हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि.२०/६/२०२६

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे (शिक्का) सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे

### जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो., (ज्यु.डि.) यांचे कोर्टात**

दि.कि.अर्ज नं.४४४/२०२६, नि.०६,

१) दिलीपभाई रघुराथ राजपुत,
२) मनिषा प्रकाश पाटील (राजपूत),
३) कविता प्रकाश राजपूत, ४) स्नेहल प्रकाश राजपूत,
५) प्रतिज्ञा प्रकाश राजपूत,
६) आयुष प्रकाश राजपूत ....अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही ....जाबदेणार

ज्याअर्थी मयत मयत रघुनाथ रामसिंग राजपूत हे दि.११/०४/२०२६ रोजी मौजे– अहिल्यापूर, ता.शिरपूर, जि.धुळे येथे मयत झालेले असून, आता अर्जदार नं.१ ते ६ यांना शासकीय व निमशासकीय कामांसाठी व अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७, कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसा संबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दिनांक २२/६/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होऊन हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणेत येईल. दि.२८/५/२०२६

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे (शिक्का) सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे

### जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो., ज्युनि.डिव्ही.यांचे कोर्टात**

दिवाणी कि.अर्ज नं.४४६/२०२६, नि.०६,

ललिता श्रीराम पवार,
रा.२४/ब हुलेसिंग नगर, करवंद नाक्याजवळ,
शिरपूर ता.शिरपूर, जि.धुळे. ....अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही ....जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार ललिता श्रीराम पवार यांनी मे.न्यायालयात नामे श्रीराम बन्सीलाल पवार हे दि.०२/०१/२०२५ रोजी मौजे बडोदा हर्ट इन्स्टीट्युट ॲण्ड रिसर्च सेंटर, वडोदरा येथे उपचारादरम्यान मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत अर्जदार याने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे करीता. अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, नामे श्रीराम बन्सीलाल पवार यांचे वारसांबाबत वर नमूद अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि.२२/६/२०२६ रोजी ठिक १०:३० वाजता मे.न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजुर करून अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर (शिक्का) सहाय्यक अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर

### जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज् सो., ज्युनि.डिव्ही.यांचे कोर्टात**

दिवाणी कि.अर्ज नं.४५२/२०२६,
नि.नं.६ चौ.ता.२३/६/२०२६

१) अशोक प्रल्हाद चौधरी,
रा.मारूती मंदिराजवळ, बभळाज, शिरपूर, जि.धुळे,
२) छाया शरद महाजन,
रा.उत्रान, ता.एरंडोल, जि.जळगांव. ....अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही ....जाबदेणार
प्रल्हाद धोंडू चौधरी, मयताचा पत्ता– बभळाज, ता.शिरपूर, जि.धुळे,
मृत्यू दि.१२/०५/२०२५ ....मयत

ज्याअर्थी अर्जदार नं.१ व २ यांचे वडील नामे प्रल्हाद धोंडू चौधरी हे दि.१२/०५/२०२५ रोजी मौजे बभळाज, ता.शिरपूर, जि.धुळे येथे मयत झालेले आहेत. मयतास अर्जदार नं.१ व २ हेच कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज मे.न्यायालयात त्यांनी दाखल केलेला आहे.


त्याअर्थी या नोटीशीने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदारांव्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यानी मे.न्यायालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अगर दि.२३/६/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वत:अगर प्राधिकृत प्रतिनींधीमार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीच वारस नाही, असे गृहीत धरण्यात येवून मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे.दिवाणी न्यायाधीश सो., क.स्तर, शिरपूर, जि.धुळे यांचे आदेशावरुन प्रसिध्दीस दिली असे. दि.२८/०५/२०२६

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर (शिक्का) सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर







## पान १ वरुन

### अकरा वर्षांत एक लाख ब्यण्णो हजार हेक्टर जंगल नष्ट

झाडांची घनता मोजताना नैसर्गिक जंगलांसोबत रबर, तेलपाम, बांबू लागवड तसेच फळबागांचाही समावेश केला जात असल्याने प्रत्यक्षातील जंगल नष्ट होण्याचे चित्र लपवले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

**इंदिरा गांधींनी मजबूत चौकट केली**

खरगे यांनी पुढे म्हटले की, माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या काळात वन्यजीव संरक्षण कायदा, जल कायदा, वन संवर्धन कायदा आणि वायू कायदा यांसारख्या महत्त्वाच्या कायद्यांद्वारे पर्यावरण संरक्षणाची मजबूत चौकट उभी केली होती. त्यानंतर संयुक्त पुरोगामी आघाडी (यूपीए) सरकारच्या काळात वनहक्क कायदा , पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन अधिसूचना, राष्ट्रीय हरित लवाद आणि हवामान बदल कृती आराखडा यांसारख्या उपाययोजनांमुळे ही चौकट अधिक बळकट करण्यात आली.

### अंदमान बेटाजवळ वायूसाठा सापडला

९०० मीटरपेक्षा जास्त खोलीवर केलेल्या प्राथमिक उत्पादन चाचणीदरम्यान वायू जाळून पाहण्याची प्रक्रिया करून नैसर्गिक वायूच्या अस्तित्वाची खात्री पटली आहे. ऑइल इंडिया सध्या या वायूचे घटक आणि उष्मा मूल्य (कॅलोरीफिक व्हॅल्यू) तपासण्यासाठी वायूचे नमुने घेण्याचे काम करत आहे. समुद्र मंथन मिशन अंतर्गत देशातील हायड्रोकार्बन साठ्यांचा पूर्ण लाभ घेण्यासाठी ऑफशोर (समुद्रातील) क्षेत्रांमध्ये मोठ्या संख्येने डीपवॉटर आणि अल्ट्रा-डीपवॉटर शोध विहिरी खोदण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

### नैऋत्य मान्सून अखेर केरळमध्ये दाखल

आसपासच्या जिल्ह्यांमध्ये तुरळक ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो. हा पाऊस मान्सूनपूर्व स्वरूपाचा असेल. वातावरणातील वाढलेली आर्द्रता आणि सक्रिय मोसमी वाऱ्यांमुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार दहा जूनच्या सुमारास मान्सून महाराष्ट्राच्या दक्षिण भागात तर पंधरा जूनपर्यंत संपूर्ण महाराष्ट्रात बरसू शकेल अशी अपेक्षा होती. परंतु यंदा केरळमध्येच मान्सून काही दिवस उशिरा पोहोचल्याने महाराष्ट्रातील आगमनाच्या तारखांमध्ये बदल होणार का ते पुढील काही दिवसांत स्पष्ट होईल. हवामान विभागाने जारी केलेल्या पर्जन्यमान नकाशामध्ये दक्षिण भारतातील अनेक भागात मुसळधार पावसाची शक्यता दर्शवण्यात आली आहे तर उत्तर भारतातील मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि राजस्थानच्या काही भागात तुलनेने कमी पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. हवामान विभागाने काही राज्यांसाठी यलो आणि ऑरेंज अलर्ट जारी केले आहेत. हवामानातील बदलांसाठी सतर्क राहण्याचा इशारा म्हणजे यलो अलर्ट. ऑरेंज अलर्ट म्हणजे अधिक गंभीर परिस्थितीची शक्यता.

**उत्तर महाराष्ट्रात वादळी पाऊस**

रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये चाळीस ते पन्नास किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. पश्चिम महाराष्ट्रात पुणे, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये चाळीस ते पन्नास किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता असून पावसाचाही अंदाज वर्तवण्यात आला आहे. शेतकऱ्यांना शेतीची प्रलंबित कामे लवकर पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. उत्तर महाराष्ट्रात नंदुरबार, नाशिक आणि जळगाव जिल्ह्यांत वादळी पावसाचा अंदाज आहे. कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून शेतक-यांना आणि लोकांना आवाहन करण्यात येत आहे की, संभाव्य हवामान बदल लक्षात घेऊन योग्य ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी. शेतक-यांनी वादळी पावसावर अवलंबून राहून मान्सूनचे आगमन होण्यापूर्वी पेरणीची घाई करू नये. विजांचा कडकडाट सुरू असताना नागरिकांनी व शेतक-यांनी स्वत:ची तसेच पाळीव जनावरांची सुरक्षितता पहावी. अशा वेळी झाडाखाली, पत्र्याच्या शेडखाली तसेच विद्युत ट्रान्सफार्मर, वीजेचे खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ उभे राहणे टाळावे.

### जिथं ताकद तिथेच लक्ष केंद्रीत करा, विजय आपलाच असेल

विचाराने सगळ्यांनी एकत्र काम करा. निवडणुकीत युती होईल किंवा नाही, ते पक्ष नेतृत्व ठरवेल पण कार्यकर्त्यांनी प्रत्येक बूथवर लक्ष केंद्रीत करुन काम करा, विजय आपलाच आहे, असे ते म्हणाले. नंदुरबारमध्ये शिवसेनेची ताकद वाढली आहे. राज्यात शिंदे साहेबांना मानणारा एक मोठा वर्ग तयार झाला आहे. जनहिताच्या अनेक कल्याणकारी योजना शिंदे साहेबांनी मुख्यमंत्री असताना राज्यात लागू केल्या, हे मतदारांना माहित आहे, त्यामुळेच नगर परिषदा, महापालिका निवडणुकीत शिवसेनेला चांगलं यश मिळाल्याचे खासदार शिंदे म्हणाले.

नंदुरबार शहरात झालेल्या दुसऱ्या बैठकीत नंदुरबार आणि नवापूर विधानसभा मतदार संघांचा खासदार डॉ. शिंदे यांनी आढावा घेतला. यावेळी ते म्हणाले की, शिंदे साहेबांनी शासन आपल्या दारी उपक्रमातून लोकांची कामे केली. शिंदे साहेबांच्या नेतृत्वावर जनतेचा विश्वास वाढलाय. इतर पक्षांचे नेते, कार्यकर्ते शिवसेनेत येण्यासाठी उत्सुक आहेत, असे खासदार डॉ. शिंदे म्हणाले. कार्यकर्त्यांनी काम करावं आणि पक्षाची ताकद वाढवा. प्रत्येक ठिकाणी धनुष्यबाण गेला पाहिजे, असे खासदार डॉ. शिंदे म्हणाले. कार्यकर्त्यांना ताकद देण्यासाठी पक्षाचे नेते कटिबद्ध आहेत, अशी ग्वाही खासदार डॉ. शिंदे यांनी यावेळी कार्यकर्त्यांना दिली. शिवसेनेची अक्कलकुवा आणि धडगाव तालुक्यात ताकद आहे. तळोदा आणि शहादा तालुक्यात पक्ष वाढवण्यासाठी प्रयतक करणे आवश्यक आहे, असे मत आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी यावेळी व्यक्त केली. आगामी नंदुरबार जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत शिवसेनेचा भगवा फडकेल, असा विश्वास आमदार रघुवंशी यांनी यावेळी व्यक्त केला. पदाधिकारी, नगरसेवकांना पक्षानं ताकद द्यावी, अशी मागणी आमदार रघुवंशी यांनी व्यक्त केली. आमदार आमशा पाडवी, शिरीष चौधरी यांनीही आपली मते मांडली.

**शिंदे साहेबांचे प्रत्येक तालुक्यावर लक्ष**

शिवसेना मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रत्येक तालुक्यावर आणि विधानसभा मतदार संघावर बारीक लक्ष आहे. त्यामुळे ४५ अंश तापमान असतानाही नेते दौरे करत आहेत, असे खासदार डॉ. शिंदे म्हणाले. आता कोणत्याही निवडणुका नाहीत तरीही शिवसेना नेते गावोगावी जाऊन कार्यकर्त्यांना भेटत आहेत. शिंदे साहेबांच्या नेतृत्वात शिवसेनेत मोठा बदल झाला आहे. आधी नेते दौऱ्यावर यायचे आणि भाषण करुन जायचे, असा टोला खासदार डॉ. शिंदे यांनी उबाठाला लगावला. आता भाषणं नाहीत तर नेते प्रत्यक्ष फिल्डवर काम करतात आणि कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधतात, असे खासदार डॉ. शिंदे म्हणाले. मागील दोन वर्षात खासदार डॉ. शिंदे यांनी चारवेळा नंदुरबारचा दौरा केला आहे.

### धुळ्यात अवैध सावकार पिता-पुत्राविरुद्ध गुन्हा

जुगनू पाटील व त्याचा मुलगा शिव जुगनू पाटील (रा. अष्टविनायक नगर, देवपूर) यानी पैशांसाठी तगादा लावला. शिवीगाळ, मारहाण करून ठार मारण्याची धमकी दिली, असेही भूषण पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी दोघांविरोधात महाराष्ट्र सावकारी अधिनियम कलमान्वये धुळे शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात झाला.

### रावेर येथील तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

प्रेमसंबंध असल्याबाबत दिनेश ऊर्फ भुऱ्या विनायक पवार (रा. रावेर) याने गावात बदनामी केली. या बदनामीमुळे विजय ठाकरे मानसिक तणावात होता. या प्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दिनेश पवार यांच्याविरुद्ध दाखल झाला. पोलीस निरीक्षक धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक खालिदा सय्यद करीत आहेत.

### भेसळयुक्त तेलसाठा मोहिदा येथून जप्त

भेसळयुक्त असण्याची शक्यता असल्याने अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी तेलाचा साठा जप्त करून सील केला. संबंधित तेलाचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित विक्रेता व इतर जबाबदार व्यक्तींवर अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### ज्येष्ठ नागरिक आघाडीतर्फे शिवराज्याभिषेक दिन

धुळे, दि.४- अखंड भारताचे आराध्य दैवत, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पावन स्मृतीस अभिवादन करण्यासाठी धुळे जिल्हा भारतीय जनता पार्टी ज्येष्ठ नागरिक आघाडी यांच्या वतीने ३५३ वा शिवराज्याभिषेक दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा ऐतिहासिक आणि प्रेरणादायी सोहळा दि. ६ जून रोजी सकाळी ७ वाजता शिवस्मारक, मनोहर चित्र मंदिराजवळ, धुळे येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकास सप्तनद्यांचे जल व दुग्धाभिषेक करण्यात येणार असून, श्री. बलदेवचंद महाराज यांच्या मुखातून मंत्रोच्चाराने अभिषेक व पूजनाचा कार्यक्रम पार पडणार आहे. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक तथा भारतीय जनता पार्टीचे माजी जिल्हाध्यक्ष ओमप्रकाश अग्रवाल, महेंद्र अग्रवाल तसेच मराठा पंच मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र इंगळे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे संयोजन भाजप ज्येष्ठ नागरिक आघाडीचे जिल्हाध्यक्ष शिवाजीराव काकडे, शरद बिरारी, संतोष खंडेलवाल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. शिवकालीन इतिहासाची साक्ष देणारा आणि स्वराज्याचा अभिमान जागवणारा हा सोहळा उत्साहात साजरा होणार असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



### शिंदखेडा ग्राहक पंचायतची बैठक बारा जूनला धुळ्यात प्रबोधन शिबीर

**शिंदखेडा, दि.५- ग्राहक पंचायत महाराष्ट्र तालुका शाखा शिंदखेड्याची बैठक शहर अध्यक्ष माजी प्राचार्य यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या निवास स्थानी संपन्न झाली. धुळे येथील जैन भवनात धुळे, जळगांव व नंदुरबार जिल्ह्यातील कार्यकर्त्यांचा प्रबोधन शिबिर १२जून २०२६शुक्रवार रोजी आयोजित करण्यात आले आहे.**

यावेळी जिल्हा संघटक प्रा. चंद्रकांत डागा,तालुकाध्यक्ष माजी प्रा. प्रदीप दीक्षित, सचिव अशोक राखेचा, सहसंघटिका नलिनी वेताळे, सदस्य छाया पवार, जितेंद्र मेखे, चारुशीला दीक्षित आदी उपस्थित होते. कार्यकर्ता प्रबोधन शिबिराच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे राज्य अध्यक्ष डॉ.विजय लाड असून स्वागताध्यक्ष जिल्हाध्यक्ष ॲड. जे.टी.देसले राहतील. जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून, राज्य सचिव अरुण वाघमारे, नाशिक विभाग अध्यक्ष डॉ.अजय सोनवणे, ग्राहक तक्रार निवारण आयोग अध्यक्ष नीता देसाई, जिल्हा पुरवठा अधिकारी संजय बागडे, जिल्हा कृषी अधीक्षक सुरज जगताप राहणार आहेत. तसेच दिवसभरात अनेक तज्ञ विविध विषयावर मार्गदर्शन करतील. बैठकी दरम्यान प्रा. डागा यांची ग्राहक पंचायत महाराष्ट्राच्या राज्य कार्यकारणी सदस्य पदी निवड झाल्याबद्दल शाल व माळा देऊन सत्कार केला. प्राचार्य प्रदीप दीक्षित यांनी ग्राहक चळवळ ही सामाजिक व आर्थिक शोषण थांबवणारी संस्था असून या संस्थेत नवीन सदस्य करून घेण्याचे प्रयत्न करण्याची गरज असल्याचे सांगितले. तसेच १२ जून रोजी धुळ्याला होणाऱ्या ग्राहक प्रबोधन शिबिरास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले.

## निधन वार्ता

### सुमनबेन पटेल



शहादा, दि.५- नंदुरबार तालुक्यातील आडछी येथील रहिवासी सुमनबेन गोरख पटेल यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८४ वर्षांच्या होत्या. त्यांचे पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. आडछी ता. नंदुरबार येथील प्रगतीशील शेतकरी बल्लूभाई पटेल व धारुभाई पटेल यांच्या त्या मातोश्री होत.

### शंकर पाटील



शहादा, दि.५- लांबोळा. ता. शहादा येथील रहिवासी शंकर गोविंद पाटील यांचे निधन झाले. मृत्यूसमयी ते ८८ वर्षांचे होते. त्यांचे पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. लांबोळा येथील प्रगतीशील शेतकरी रमेश पाटील व भगवान पाटील यांचे ते वडील होत.

**पाहिजेत**
माल वाटपासाठी अनुभवी डिलीव्हरी बॉय आणि ड्रायव्हर पाहिजेत.
- समक्ष भेटा -
कंचन डिस्ट्रीब्युटर्स
सराफ बाजार, रामदेव बाबा मंदीर जवळ, धुळे

**पाहिजे**
१) फार्मासिस्ट
२) कॉम्प्युटर ऑपरेटर
अनुभव आवश्यक
8208879381
9423495381

**पाहिजेत**
दुकानाच्या कामासाठी शिकाऊ माणुस चांगला पाहिजे.
श्रीकृष्ण इलेक्ट्रीकल
मामलेदार कचेरीसमोर, धुळे
9421619402

**पत्रकार बांधव**
धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघ(आपला महाराष्ट्र) धुळे सभासद नोंदणी सुरु असून दि.६ जुन ते १३ जुन २०२६ पर्यंत संघाचे सदस्याचे फार्म भरुन देणे आहे. त्यासाठी फार्म फी.१० रु व सदस्य फी रु.५० असे एकूण साठ रु भरावयाचे आहेत. तरी सर्व सदस्यांनी मुदतीत फार्म भरुन सहकार्य करावे. कळावे
वेळ - सकाळी ११ ते ४ वाजेपर्यंत
डी.बी.पाटील, सरचिटणीस
यशवंत हरणे, अध्यक्ष
धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघ

**प्लॉट विकणे आहेत**
आर्वी NH-3 हायवेलगत केले नगर येथील गट नं.२२८ या ले-आऊट मधील प्लॉट विकणे आहे.
आर्वी NH-3 हायवेलगत श्रीकृष्ण नगर येथील गट नं.२३२ या ले-आऊट मधील प्लॉट विकणे आहे.
आर्वी NH-3 हायवेलगत भगवती विहार येथील गट नं.२६५/३/१ या ले-आऊट मधील प्लॉट विकणे आहे.
संपर्क - 9422792677, 8888192677

**पेवर ब्लॉक**
उच्च दर्जाचे पेवर ब्लॉक मिळतील.
शांती सिमेंट प्रॉडक्टस, डी.६५, एमआयडीसी, अवधान, धुळे
- संपर्क -
9422289550

**पाहिजे**
धुळेच्या सुप्रसिध्द बेकरी मध्ये Marketing and Sales साठी माणूस पाहिजे. लिहिता आणि वाचता येणे आवश्यक.
लाईफ लाईन बेकरी
मालेगा रोड, धुळे.
8999961619

**प्लॉट विकणे आहे**
धुळे नगावबारी हॉटेल साई किशनमागे हिंगलाज माता मंदिरजवळ, २९७/२ मधील उत्तर मुखी प्लॉट नं. ३३/३६/३७ विकणे आहे.
: संपर्क :
प्रशांत भावसार फेटेवाले
9422287548

**पाहिजेत**
मेहेरगांव -शिरडाणे येथे शेतात राहण्यासाठी फॅमिली पाहिजे.
सर्व सोयींसह
: संपर्क :
9422287548

**हॉस्पिटलसाठी भाड्याने देणे आहे**
प्रकाश टॉकीज परिसर, प्लॉट नं.२४, बडगुजर प्लॉट येथे डॉ.सुभाष भामरे यांच्या शेजारी ८० फुटी रोडलगत सुमारे १५०० चौ. फूट तळमजल्यावरील प्रशस्त जागा भाड्याने देणे आहे. हॉस्पिटल, क्लिनिक, योग्य पार्किंग व २४ तास पाणी सुविधा.
7507824059
7776050787

**त्वरीत भरती**
आर.एम.केमीकल प्रा. लि. अवधान MIDC धुळे
प्रोडक्शन विभाग
जागा-३०
सुपरवायझर - ०५
-: संपर्क :-
संस्कृती युनिव्हर्सल सर्व्हिसेस, धुळे
9373702191
9325828161

**विकणे आहे**
2 BHK फ्लॅट व दुकान १ महिन्यात ताबा
१) इंद्रा आर्केड, प्लॉट नं. ६०, जयहिंद कॉलेज रोड, जयहिंद कॉलनी देवपूर, धुळे
२) उषा हाईट्स, प्लॉट नं. १०३, जयहिंद कॉलनी सोना सुपर शॉप समोर, धुळे
-: संपर्क :-
8698955000

**प्लॉट विकणे आहे**
डी मार्ट सुगंधनगरच्या पुढे सर्व्हे. नं.४७६/२A प्लॉट नं.१, १८५६/- स्के.फुट विकणे आहे.
- संपर्क -
8275590578

**भाड्याने देणे**
बांबू गल्लीत पहिल्या मजला दर्शनी रस्त्याकडील १००० फुटी हॉल वैद्यकीय व्यवसायासाठी उपयुक्त.
8408958097

**वीर सावरकर जयंती निमित्त शुभारंभ**
**वीर सावरकर अपार्टमेंट**
फ्लॅट बुकिंग व भाड्याने देणे आहे.
फ्लॅट एरिया :- 1 BHK - 1000 स्के.फुट, 2 BHK - 1200 स्के.फुट, 3 BHK - 1350 स्के.फुट
बुकिंगसाठी संपर्क
मालक तात्यासाहेब रघुनाथ भगवान चौधरी
मो. 9405466937
इंजि.राजेंद्र के.खैरनार (बी.ई.सिव्हिल)
मो. 9422789513
पत्ता : वाणी मंगल कार्यालयाजवळ, भिडेबाग देवपूर, धुळे

**व्यवस्थापक पाहिजे**
श्री. जलाराम बापा मंदीर, धुळे नटराज टॉकिज मागे येथे ४० ते ५० वयोगटातील दांपत्यास रहाण्याची सोय मंदीराचे व्यवस्थापकनाची जबाबदारी सांभाळावी लागेल.
-: संपर्क :-
7588888124
9423411265

**घर विकणे आहे**
दोन हजार स्क्वेअर फुट प्लॉट वरील आठ खोल्यांचे एक मजली घर विकणे आहे. घराच्या आवारात पेरू आंबा जास्वंद अंजीर आवळा यांची झाडे आहेत.
पत्ता- नवजीवन नगर फाशी पूलाजवळ,
9529997352
9881255577

**पाहिजेत**
भारत पेट्रोलियम कॉर्पो रेशन लिमिटेड (BPCL) पंपावर डिझेल/पेट्रोल/गॅस भरण्यासाठी अनुभवी मुले पाहिजेत
पगार : १० - १५ हजार + बोनस+विमा
: समक्ष भेटा :
9225640005

**पाहिजेत**
झेरॉक्स व ऑनलाईन कामासाठी मुलगा पाहिजे.
: संपर्क :
स्वामी मल्टी सर्व्हिसेस
छ. शिवाजी महाराज व्यापारी संकुल, मनोहर चित्रमंदिर जवळ, अग्रारोड, धुळे
7776935111

**पाहिजेत**
आयुर्वेद हॉस्पिटलमध्ये कम्पाउंडर पाहिजेत.
जागा : २ पुरुष, ३ स्त्री,
पत्ता : डॉ. जगताप यांचे
लताकुसुम हॉस्पिटल
ग.नं. ६, भांग्या मारुती चौकाजवळ, जय प्रकाश चौक, धुळे
9422269550

**पाहिजेत**
होलसेल मेडीकल दुकानासाठी कॉम्प्युटर ऑपरेटर
लेडिज जागा-२
: समक्ष भेटा :
श्रीसाई फार्मा
गल्ली नं.५, बँक ऑफ इंडिया समोर, धुळे
9270144871
9270144871

**पाहिजेत**
हॅण्डलुम दुकानात कामासाठी लेडीज/जेण्टस सेल्समन पाहिजेत, तसेच लेडीज कॉम्प्युटर ऑपरेटर लावणे आहे. समक्ष भेटा.
अजिंक्य हॅण्डलुम
ग. नं. ८ जिनगर गल्ली, धुळे

**बंगला भाड्याने देणे आहे**
देवपूर, दत्तमंदीर चौकापासून जवळ गोंदूर रस्त्यालगत असलेला, सत्संग कॉलनीमधील प्लॉट नं.६१ मधील लिव्हींग रुम, कीचन, तीन बेडरुम, दोन टॉयलेट क्लोजड्, कार पार्किंग, कॉर्पोरेशनचे व विहीरीचे पाणी असलेला बंगला शासकीय कर्मचारी, बँक, एलआयसी कर्मचारी यांना भाड्याने देणे आहे.
संपर्क :- 9421531431

**पाहिजेत**
- नर्स (ANM GNM)
- R.M.O
- रिसेप्शनिस्ट
- B.Sc.ऑप्ट्रोमेट्रीस्ट
संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

**पाहिजेत**
M.I.D.C.मध्ये गोडावून व ऑफिस कामासाठी मुलगा पाहिजेत. कॉम्प्युटर येणे आवश्यक
: संपर्क :
9511706150

**फ्लॅट विकणे**
प्रशस्त 2 BHK चे फ्लॅट सर्व सोयीयुक्त २४ तास पाणी, प्रशस्त पार्कींग, शाळा, मार्केट, हॉस्पिटल पासून अगदी जवळ, वाडीभोकर रोड पासून २ मिनीट अंतरावर असे उत्कृष्ट लोकेशन, बँकेतून होम लोन उपलब्ध.
: संपर्क : 9623099997

**कुलिंग इंडिया की पहचान**
Symphony | Crompton
आत्ता पर्यंतच्या कुलर्सच्या तुलनेत सर्वात स्टायलिश मॉडेल्स्'



आता खरेदी करा कूलर 0% EMI वर
BAJAJ FINSERV 0% E.M.I फायनान्सची सुलभ सुविधा उपलब्ध.
नियम व अटी लागू
ak media- 238222
58 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोनः 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०